# प्रकरण चौथे

# कराड नगरपालिकेची सांस्कृतिक वाटचाल

## प्रकरण चौथे

# कराड नगरपालिकेची सांस्कृतिक वाटचाल

शिक्षण हे मानवी जीवनाचे प्रमुख अंग आहे. कारण शिक्षण मानवास अंधारातून प्रकाशाकडे नेते शिक्षण ही जीवनाच्या अनेक गरजांपैकी प्रमुख गरज आहे ते साध्य नसून साधन आहे. शिक्षणाने व्यक्ति चारित्र्यवान बनते. महात्मा गांधी म्हणतात ''सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय'' विद्यार्थ्याचे संवर्धन व पालनपोषण व विकास शिक्षण करते व चारित्र्याचा विकास हेच सर्वात मोठे शिक्षण होय.

शिक्षण व्यवस्थेचे टप्पे पहात असताना प्राचीन काळी भारतीय समाजात शिक्षणाचे स्थान महत्वाचे असून गुरु सर्वश्रेष्ठ व वंदनीय असे राजापेक्षा गुरुचे स्थान श्रेष्ठ असे हे रामायण, महाभारतातील अनेक उदा. दिसून येते. गुरुंना समाजात मान्यता श्रेष्ठ दर्जा, प्रतिष्ठा असे. गुरुंचा कल विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर असे गुरुकुल/आश्रम पध्दतीचे शिक्षण असून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधला जाई.

प्राचीन काळी शिक्षणाला विकासाची गुरु किल्ली म्हणून ओळखले जात असे. बी. के. ठाकुर आपल्या ऐतिहासिक घटना या ग्रंथात लिहितात प्राचीन भारतामध्ये गौतम बुध्द व भगवान महावीर यांच्या काळात आजच्या इतकीच शैक्षणिक पगती झाली होती. मुलांना गुरुकुलातून शिक्षण दिले जात असे मत परकिय प्रवाशी हयु. एन. संग यांनी मांडले'. नालंदा तक्षशिला सारख्या प्राचीन भारतीय विद्यापीठातून परकिय विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन जात असत.

मध्ययुगीन काळ राजकीय दृष्टया अस्थिर असल्याने शिक्षणाचे स्थान घसरत गेले.

ब्रिटिश काळात भारतीय समाज जीवनात परिवर्तन घडून येऊन शिक्षणाचा प्रसार झाला. यात लॉर्ड मेकॅलो, बेटिंग, वूड यांची कामगिरी महत्वाची होती व विशिष्ट वर्गापुरती मर्यादित असलेली शिक्षणाची मक्तेदारी या कालखंडात संपली व शिक्षण सर्वांसाठी खुले झाले.

शिक्षण विषयी संस्थापकाच्या सहकार्याने भारतामध्ये अनेक पाठशाला काढल्या या शाळेचा लाभ भारतीय मुलांना होऊ लागला पण या शाळा अनियंत्रीत व सदोष होत्या. या शाळांवर राज्य सरकारचे बंधन नव्हते. भारतीय लोकांना नियमित व योजनाबध्द शिक्षण देणेचे काम ब्रिटिश ख्रिश्चन मिशनरी यांच्या शिक्षण संस्थातून केले जात असे. काही अंशी म्हणता येईल त्याच्या शिक्षण पध्दतीवर जरी टिका केली जात असली तरी ख-या अर्थाने या ख्रिश्चन मिशनरींनी भारतीयांना पदवीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध करुन दिले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही[२].

शिक्षण विषयक विचार मांडताना स्वामी विवेकानंदांनी - गरीबीचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव आहे. म्हणून सर्वसामान्यांचा मागासलेपणा नाहीसा करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व प्रचार होणे आवश्यक आहे. तेव्हाच देशाची प्रगती होईल असे विचार मांडले. अनेक समाज सुधारकांनी सामाजिक कार्यातून शिक्षणाचा प्रसार घडवून आणला. त्यातूनच कराड नगरपालिकेनेही शिक्षणाची गरज लक्षात घेऊन त्या क्षेत्रात महत्वाची पाऊले उचलली व शिक्षणाचा विकास घडवून आणला. हे नगरपालिका शिक्षण क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेतना आपल्याला दिसून येते.

**शिक्षण मंडळ स्थापन होण्यापूर्वीची शैक्षणिक स्थिती -**

दि. २७-७-१९७६ कराड नगरपालिका शिक्षण मंडळ स्थापन झाले. पण यापूर्वीही प्राथमिक शिक्षणाची गरज व उणीव भरुन काढण्यासाठी काही शिक्षणप्रेमी

नागरिकांनी दि. १-८-१८५४ रोजी हल्लीच्या शाळा नं. १ च्या स्थापनेने शहरात संघटित प्राथमिक मुहूर्तमेढ रोवली.

शहरातील प्राथमिक शाळांचा ताबा सन १८८५ पर्यंत सरकारकडे असला तरी नगरपालिकेच्या स्थापनेबरोबर शहरातील प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी मात्र नगरपाकिलकेकडे आली. नगरपालिकेने मे १८५६ मध्ये म्युनिसिपल फंडातून रु. ७८-०-८ खर्च करुन विद्याशाळेची इमारत दुरुस्त केली. या कामासाठी नागरिकांनीही रु. ३७-८-० वर्गणी दिली.

विद्याशाखेचे स्कूल मास्तर गणेश नारायण यांनी दि. २०-३-१८५६ रोजी कमेटीकडे यादी पाठवली व ठराव नं. ५८ ता. २१ मार्च १८५६ नुसार जी यादी पाठवली त्यातील मजकूर असा होता.

"म्युनिसिपल फंडाकडील पैशाची व्यवस्था लोकहितार्थ ज्या गोष्टी त्या करण्याकडे होणार त्यास कसबे मजकूर येथील सरकारी शाळेत जी मुले लिहिण्यास येतात त्यास व शिक्षण मंडळीस बैठकीची व इतर आवश्यक सामानाची फार अडचण आहे. या शाळेत मुले हुशार होऊन जो लाभ होणर आहे तो व्यक्तिचाच आहे असे नाहीतर सर्व लोकांस होणार आहे. या करिता शाळा मजकुरीचे सामान आवश्यक पाहिजे."

गणेश नारायण स्कूल मास्तरांनी यासाठी मुलांना बसावयास बाके- १०, बुकेस १, खुर्च्या ५, जाजम, तक्क्या, स्टुले असे एकूण ६१ रु. साहित्यांची यादी दिली होती. कमिटी मेंबरांनी या यादीची त्वरित दखल घेतली व अभिप्रायवजा ठराव पास केला.

ही घटना पाहता नगरपालिकेच्या कारभारातील पहिल्या बॉडीतील मेंबरांचा आणि शाळा मास्तरांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन किती अर्थपूर्ण होता हे

समजले जाते. कारण आज शिक्षणाच्या सर्वप्रगत सुविधा उपलब्ध असलेल्या कराड शहरास विद्यानगरी असे म्हटले जात आहे. हा पाया पूर्वी एका वेगळ्या दृष्टीकोनातून घातला गेला आहे.

१८५४ मध्ये शहरात पहिली प्राथमिक शाळा सुरु झाली. त्यानंतर वर्षभरात आणखी चार शाळा सुरु होऊन १८८५ मध्ये शहरातील प्राथमिक शाळांची संख्या पाच झाली. या प्राथमिक शाळांचा ताबा सरकारकडे होता. फक्त त्यावर काही प्रमाणात खर्च नगरपालिका करीत होती[३].

**प्राथमिक शाळांचा ताबा नगरपालिकेकडे -**

आपल्या गावातील प्राथमिक शाळांची संख्या वाढली तरी त्याचा दर्जा सुधारण्याची गरज नगरपालिकला भासली त्यांनी या शाळांचा ताबा आपणाकडे द्यावा अशी मागणी सरकारकडे केली व १८८६ पासून प्राथमिक शाळा नगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्या. सरकारने जी. आर. नं. १८४२ ता. १२-१०-१८८५ ने शहरातील प्राथमिक शाळा नगरपालिकेच्या ताब्यात दिल्या आणि जी. आर. नं. ५५०२ दि. ३-८-१८८६ ने प्राथमिक शिक्षणासाठी नगरपीलकेस १८८५ सालापासून वार्षिक ९५७ प्रमाणे ग्रँट मंजूर केली. नगरपालिकेने सरकारकडून ताबा घेतला. त्या वेळची शहरातील प्राथमिक शिक्षणाची माहिती खालील प्रमाणे -

| अ.नं. | शाळेचे नाव | मुलांची संख्या | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | मराठी शाळा नं. १ | २१२ | ८ |
| २. | मराठी शाळा नं. २ | ८८ | ३ |
| ३. | मराठी शाळा नं. ३ | ९६ | ३ |
| ४. | मराठी शाळा नं. ४ | ६७ | ३ |
| ५. | मराठी शाळा नं. ५ | ३५ | २ |

मामलेदार कचेरीचे बांधकाम १८९६ पूर्ण झाले. त्यामुळे सोमवार पेठेतील रिकामी झालेली कचेरीची इमारत (हळलीची शाळा नं.१ ची जागा) नगरपालिकेने सरकारकडे शाळेसाठी मागितली त्यावरुन दि. जुलै १८९६ रोजी सरकारने सदरची इमारत नगरपालिकेच्या ताब्यात दिली[४].

**इंग्रजी शिक्षणाचा विकास -**

शहरात इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी यासाठी नागरिकांनी शिक्षण खात्याकडे बरेच दिवस प्रयत्न चालविले होते. याबाबत नगरपालिकेने पुढाकार घ्यावा असे मे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांनी ता. १८-८-१८७५ च्या पत्राने सुचविल्यावरुन नगरपालिकेने इंग्रजी शिक्षणासाठी मासिक रु. १५ प्रमाणे मदत करण्यावा ठराव केला.

नगरपालिकेच्या या मदतीतूनच प्राथमिक शाळा नं.१ मध्येच सन १८७८-७९ सालापसून इंग्रजी शिक्षणाचा पहिला तीन इयत्तांचा क्लास सुरु झाला व मातृभाषेच्या शिक्षणाबरोबर इंग्रजी माध्यमाचे महत्व ओळखून नगरपालिकने या शिक्षणाकडे तितकेच लक्ष दिले.

सन १८७८-७९ साली सुरु केलेल्या इंग्रजी वर्गाची यावेळपर्यंत बरीच वाढ झाली म्हणून नगरपालिकेने जाने. १९०९ पासून ५ वी पर्यंत इंग्रजी शाळा सुरु केली आणि त्या शाळेवर बी. ए. (ग्रॅज्युएट) शिक्षकाची नेमणूक केली. श्री शंकर वामन आगरकर यांनी इंग्रजी शिक्षणाचा एक खाजगी वर्ग सुरु केला होता. त्यास उत्तेजन म्हणून नगरपालिकेने नोव्हें. १८९७ पासून दरमहा दोन रुपया प्रमाणे मदत सुरु केली.

१८७८-७९ साली नगरपालिकेने प्राथमिक शाळा नं. १ मध्ये सुरु केलेल्या तीन इयत्तेच्या इंग्रजी वर्गांची मजल १९१० सालात ५ इयत्तापर्यंत गेली. १९२१ सालापर्यंत म्युनिसिपालटीच्या इंग्रजी शाळेची प्रगती कायम राहिली.

ता. १-८-१९२० रोजी लोकमान्य टिळक मृत्यु पावले. त्यांच्या दुखवटा सभेत लोकमान्यांच्या नावाने इंग्रजी शाळा काढून त्यांचे स्मारक उभारण्याचा प्रमुख नागरिकानी निर्णय घेतला आणि त्यासाठी 'शिक्षण मंडळाची' स्थापना केली. नगरपालिकेने चालवेलेली इंग्रजी शाळा शिक्षण मंडळाच्या ताब्यात मिळावी असा शिक्षण मंडळाचा अर्ज आल्यावरुन नगरपालिकेने ता. २७-३-१९२१ रोजी सभेत ठराव करुन खालील अटींवर म्युनिसपालटिची शाळा शिक्षण मंडळाच्या ताब्यात ता. १-४-१९२१ रोजी दिली.

१. या इंग्रजी शाळेकरिता शिक्षण मंडळास नगरपालिकेकडून वार्षिक रु. २००० ग्रँट दिली जाईल.

२. नगरपालिकेने शाळा ताब्यात दिल्या पासून एक वर्षाच्या आत शाळेकरिता दहा खोल्यांची इमारत शिक्षण मंडळाने बांधावी.

३. नगरपालिकेचे दोन प्रतिनिधी शिक्षण मंडळाच्या बोर्डावर असावेत नगरपालिकेने आपली इंग्रजी शाळा शिक्षण मडळाच्या ताब्यात दिल्या पासनू दोन वर्षात तिचे रुपांतर पूर्ण हायस्कूलमध्ये होऊन त्यास 'टिळक हायस्कूल' नाव देण्यात आले.

१९९३ मध्ये कराडमध्ये शिक्षण मंडळाच्या शाळांची संख्या १० होती. सुरुवातीस नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या शाळांची संख्या ८ होती. पुढे त्यात वाढ होऊन नगरपालिका शाळेची संख्या १० झाली. त्याचप्रमाणे ८ खाजगी शाळा होत्या.

**मराठी शाळा नं.१ -**

स्थापना १८५४ साली झाली. शहरातील ही पहिली प्राथमिक शाळा होय. १८५६ मध्ये या विद्याशाळेची इमारत नगरपालिकेने म्युनिसिपल फंडातून वापरुन दुरुस्त

केली. त्यासाठी नागरिकांनीही रु. ३७-८ आणे वर्गणी दिली. ही शाळा हल्ली ज्या वाडयात भरते तो वाडा त्या ठिकाणची मामलेदार कचेरी हलविल्यानंतर नगरपालिकेने सरकारकडून प्राथमिक शाळेसाठी ता. ११ जुलै १८९६ रोजी मिळवला. या वाडयाच्या दुरुस्तीसाठी लागणा-या रक्कमेपैकी दोन तृतीयांश रक्कम म्हणजे २००० रु. नगरपालिकेने भरलेले होते. १९४७ पासून या शाळेचे रुपांतर 'क्रॉफ्ट सूल' मध्ये झाले असून सूतकाम, विणकाम, शिकवले जाते. शाळेत १६ शिक्षक आणि ५०४ विद्यार्थी होते.

मराठी शाळा नं.२ -

स्थापना १-४-१८७३ स्थापनेवेळी ही शाळा मंडईमधील नगरपालिकेच्या इमारतीमध्ये भरत असे. विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेल्याने ती शुक्रवार व रविवार पेठेतील भाडयाच्या इमारतीत हलविण्यात आली. १९५१ सालापासनू या शाळेत कार्ड बोर्ड व लाकूड या मूलोद्योगाचे शिक्षण चालू आहे. या शाळेत सन १९५५ ७०० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

**मराठी मुलींची शाळा नं. ३ -**

१९४२ सालापर्यंत शहरात मुलींची एकच शाळा होती. त्यासाठी नागरिकांच्या प्रयत्नाने ही दुसरी शाळा उघडण्यात आली. शुक्रवार पेठेतील भाडयाच्या इमारतीमध्ये भरत असून शाळेत ११ शिक्षिका नि ४३५ विद्यार्थिंनी होत्या.

**मराठी मुलींची शाळा नं. ४ -**

१ मे, १८६९ रोजी या शाळेची स्थापना झाली. शाळेत सातवीपर्यंतचे वर्ग असून १५ शिक्षक व ५२५ मुलींना शिक्षण देत असते.

**उर्दू शाळा नं. ५ -**

स्थापना ६-६-१८७२ ही शाळा जुम्मा मशीद व मंडई नजिकच्या भाडयाच्या इमारतीत भरत असे. उर्दू शाळेची भागशाळा म्हणून म्युनिसिपल दवाखान्यासमोर काही वर्ग सुरु होते. शाळेत सातवी पर्यंतचे वर्ग असून विद्यार्थी ४४८ व १२ शिक्षक होते.

**मुलींची उर्दू शाळा नं. ६ -**

स्थापना १ मे १९०९ शाळेत सातवीपर्यंतचे वर्ग असून १९४४ सालापासून शाळेला जोडून तिस-या इयत्तेपर्यंतचे इंग्रजी वर्गही चालू करण्यात आले होते. १९५५ ला या शाळेत १२ शिक्षिका ४०० मुलांना शिक्षण देत असत.

**मराठी शाळा नं. ७ -**

शहराच्या तळभागातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून ता. २०-१०-१९३० रोजी ही शाळा उघडण्यात आली. या शाळेत १० शिक्षक असून ६७५ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

**मराठी शाळा नं. ८ -**

हरिजन विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून ही शाळा ता. १-८-१९०६ रोजी बुधवार पेठेत सुरु करण्यात आली असून १९५५ साली शाळेत ५१ विद्यार्थी आणि १४ विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या.

**मराठी शाळा नं- ९ -**

स्थापना १-७-१९७४ साली झाली शाळेत मुले-मुली ५८७ व शिक्षक १२ होते.

**मराठी शाळा नं. १० -**

स्थापना १-१-१९८१ या शाळेत मुले-मुली ४१४ असून १० शिक्षक होते.

या व्यतिरिक्त खाजगी शाळेत प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली.'

**खाजगी शाळा -**

१. नूतन मराठी शाळा -

शिक्षण मंडळाने मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण देण्यासाठी ही शाळा सुरु केली असून या शाळेत ३९७ विद्यार्थी होते.

२. आदर्श प्राथमिक शाळा

३. जिजामाता शाळा -

श्रीमती बनुबाई हवालदार यांनी ता. १-६-१९५३ रोजी ही शाळा सुरु केली. तिस-या इयत्तेपर्यंत वर्ग असून ७५ हरिजन व ८० इतर मुले-मुली होती.

४. कै. का. ना. पालकर प्राथमिक शाळा

५. पूर्व प्राथमिक शिक्षण -

पाच वर्षाच्या आतील बालकांच्या शिक्षणाची पूर्व तयारी होण्यासाठी मॉन्टेसरी पध्दतीच्या धर्तीवर शहरात तीन संस्था कार्यरत होत्या.

६. शिवाजी प्राथमिक शाळा

७. बालक मंदिर -

श्रीमती बनुबाई हवालदार यांनी ता . १-४-१९४८ पाच वर्षाच्या आतील मुला मुलींकरिता 'बालक मंदिर' सुरु केले. बालक मंदिरात ९ ५ मुले मुली शिकत असून त्यास नगरपालिका १९४८ सालापासून वार्षिक रु. २०० मदत देत असे.

८. प्रॅक्टेसिंग स्कूल

९. आदर्श शिशु विहार -

श्री दादासाहेब अळतेकर यांच्या सहकार्याने श्रीमती आंबर्डेकर व श्री परांजपे यांनी ही संस्था ता. १५-७-४८ रोजी सुरु केली. त्यास नगरपालिका १९४९ पासून २०० रु. मदत देत असे.

१०. बालमोहन विद्यालय -

श्री ग्रामोपाध्ये यांनी ही संस्था ता. २२-८-१९५२ रोजी सुरु केली. या विद्यालयात ८० मुले विद्यार्जन करिता या शाळेस नगरपालिका १५० रु. मदत देते.

**दुय्यम शिक्षणास नगरपालिकेकडून मदत -**

नगरपालिकेने केवळ प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी उचलली नाही तर प्राथमिक शिक्षण नंतर मुलांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी व त्यांना शिक्षणाच्या सुविधा कराड मध्येच उपलब्ध व्हाव्यात यासाठी दुय्यम शिक्षण व्यवस्थेमध्ये देखील महत्वाचा वाटा उचलला आहे.

टिळक हायस्कूल -

लोकमान्य टिळकांच्या स्मारक प्रित्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या टिळक हायस्कूलला नगरपालिकेकडून २००० रु. ग्रॅंट देण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्र हायस्कूल -

**श्री गोविंद पांडूरंग देव यांनी 'महाराष्ट्र ए. व्ही. स्कूल' नावाने इंग्रजी शिक्षणाचे** जे वर्ग १९३० साली सुरु केले त्याचे १९४२ महाराष्ट्र हायस्कूल मध्ये रुपांतर झाले. या संस्थेस नगरपालिका वार्षिक १५०० रु. मदत देते.

शिवाजी विद्यालय -

श्री- प्र.ल. करंबेळकर, ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मदतीने शिवाजी एज्युकेशन सोसायटीची १९४५ स्थापना केली. नगरपालिका या संस्थेस १५०० रु. ग्रँट देत असे.

कन्या शाळा -

१८४८ साली महात्मा फुलेंनी पुण्यात मुलींच्यासाठी पहिली शाळा काढली व महाराष्ट्राला जो आदर्श घालून दिला तो आदर्श पुढे चालवण्यामध्ये कराडने कोणत्याही प्रकारची कुचराई केली नाही. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगात उध्दारी". या ज्योतिबांचे वाक्य प्रत्यक्षात अंमलात आणले व वन मदर इन बेटर दॅन हंड्रेड टिचर या म्हणीला अनुसरुन स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखून स्त्रीयांसाठी शिक्षणाचे दालन खुले केले. १९४० साली कन्या शाळेची स्थापना केली. या शाळेच्या इमारतीसाठी नगरपालिकेने मंगळवार वेशीलगतची जागा दिली. कन्याशाळेत ३३१ विद्यार्थिनी दुय्यम शिक्षण घेत होत्या. कन्या शाळेस नगरपालिका वार्षिक १५०० मदत देते.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा विद्यालय -

१९३८ साली सुरु झाले. नगरपालिकेकडून २५० रु. मदत या शाळेस दिली जाते.

संस्कृत पाठशाळा -

संस्कृत विद्याभ्यासास : कराडास प्राचीन काळापासून पुष्कळ महत्व आहे. वेदविद्या प्रवीण असे अने विव्दान या शहरात होऊन गेले. संस्कृत भाषेच्या अभ्यासाची परंपरा कराडात आजही आहे. १९२२ सालापासून संस्कृत पाठशाळा चालू होती.

या शिवाय इतर विद्यालयातून अरबी भाषा, संगीत, शिक्षण मुलांना दिले जाते.

तसेच कराड शहरातील तरुणांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी अनेक कॉलेजची स्थापना केली आहे. त्यात सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, सायन्स कॉलेज, वेणूताई कॉलेज, महिला कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज , मेडिक ल कॉलेज यातून मुलांना उच्च शिक्षण घेता येते[६].

**जिल्हा स्कूल बोर्डाकडे शिक्षण -**

शहरातील म्युनिसिपल ताब्यात असलेल्या प्राथमिक शाळा लोकल बोर्डाच्या ताब्यात देण्याबद्दल मे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग, पुणे यांनी दि. २७-१-१९२३ च्या पत्राने नगरपालिकेस सुचविले. त्यावेळी सरकारी मदत वजा जाता प्राथमिक शिक्षणावर निव्वळ नगरपालिकेचा खर्च वर्षास ९,८६२ रु. होता. आर्थिक अडचणीत प्राथमिक शिक्षणाचा वाढता खर्च भागवून प्राथमिक शिक्षणाची प्रगती आपल्या हातून करणे शक्य होणार नाही असे नगरपालिकेस वाटल्यावरुन तीने प्राथमिक शाळांचा ताबा एक ठराव करुन १ जून १९२५ रोजी लोकल बोर्डाकडे दिला. तेव्हा पासून प्राथमिक शाळा लोकल बोर्डाच्या ताब्यात गेल्या. यानंतर शाळांचे सर्व व्यवस्थापन जिल्हा स्कूल बोर्डाकडे सुर्पूत करण्यात आले. शिक्षकांच्या नेमणुका त्यांच्यावर देखरेख व शाळांना लागणा-या सुखसोई व समस्यांचे निराकरण त्यांचेकडून होऊ लागले व बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ चे कलम ४१ प्रमाणे नगरपालिकेनी जिल्हा स्कूल बोर्डास

प्रायमरी एज्युकेशन फंड वर्गणी देणे गरजेचे होऊ लागले. त्याप्रमाणे कराड नगरपालिका सुमारे ८ ते ९ हजार रु. प्रतिवर्षी लोकल बोर्डाला अनुदान देत असे.

शालेय व्यवस्थापनावर जरी जिल्हा स्कूल बोर्डाचे नियंत्रण असले तरी शाळेच्या अडीअडचणी त्याच्या समस्या जिल्हा स्कूल बोर्डाच्या लक्षात आणून देणेचे काम नगरपालिका करत होती[७].

## जिल्हा परिषदेकडे शिक्षण -

सन १९६१ ला दि महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद ॲन्ड पंचायत समिती ॲक्ट पास झाला[८]. या कायद्याप्रमाणे सर्व जिल्हास्तरावर जिल्हा परिषद तर तालुका स्तरावर पंचायत समित्यांची स्थापना झाली व १ मे, १९६२ पासून त्यांचा अंमल सुरु झाला. जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र शिक्षण विभाग सुरु करणेत वरील कायद्याने जिल्हा स्कूल बोर्ड रद्द करणेत आले व त्याचा सर्व कारभार जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आला व शिक्षणाची सर्व जबाबदारी पेलणेचे काम जिल्हा परिषदेकडे आले.

१९२५ नंतरच्या कालावधीत त्या प्राथमिक शाळांसाठी अनुदान देण्याव्यतिरिक्त नगरपालिकेचा तसा काही संबंध नव्हता.

## कराड नगरपालिका शिक्षण मंडळाची स्थापना -

प्राथमिक शाळांना अनुदान देण्याव्यतिरिक्त नगरपालिकेचा तसा काही संबंध नव्हता .जिल्हा परिषदेकडे १९७६ सालापर्यंत प्राथमिक शिक्षण होते. पण शाळांची स्थिती शोचनीय होती. शहरात जिल्हा परिषदेच्या मालकीच्या १२ खोल्या होत्या व शहरातील इतर प्राथमिक शाळा भाडयाच्या इमारतीमध्ये भरविल्या जात होत्या. पण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पी. डी. पाटील नगराध्यक्ष झाले नी त्यांनी नगरपालिकेचे हे पुरोगामी धोरण अधिक दृढ केले. शेवटी जबाबदारी नसली तरी

कर्तव्य भावनेने त्यांनी शिक्षणासाठी चांगल्या सुविधा, क्रिडांगण आदी बाबींसाठी नगरपालिकेने या सर्व प्राथमिक शाळासाठी आपल्या अंदाजपत्रकात तरतूद करुन एखाद्या महाविद्यालयाला शोभेल अशा इमारती प्राथमिक शाळासाठी बांधल्या व पुन्हा एकदा प्राथमिक शाळांचा ताबा नगरपालिककाकडे घेण्यासाठी दि. बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ चे कलम १६ मधील तरतुदी नुसार कराड शहरातील प्राथमिक शिक्षण नगरपालिका ताब्यात मिळणे करिता महाराष्ट्र शासनास विनंती करणे संबंधीचा कार्यालयीन अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ४९ (२) पी मधील तरतुदीनुसार ठरविणेत येत आहे. दि. बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ चे कलम १६ (१) मधील तरतुदी नुसार कराड नगरपालिका ही अधिकृत आहे"[१०].

पुन्हा एकदा प्राथमिक शाळांचा ताबा जिल्हा परिषदेकडून स्वतःच्या ताब्यात नगरपालिकेने घेतला व त्या ठरावाची दखल घेऊन नगरपालिकेने शिक्षणाचा दर्जा उंचवण्यासाठी दि. २७ जुलै १९७६ रोजी नगरपालिकेने स्वतंत्र शिक्षण मंडळाची स्थापना करुन त्यांच्या मार्फत कराड शहरातील प्राथमिक शाळा चालविण्यास सुरुवात केली".

डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट १८८४ च्या कायद्यानुसार सदर कमिटीची स्थापना झाली असून त्याला म्युनिसिपल स्कूल बोर्ड हे नाव देणेत आले. त्यानंतर बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट प्रमाणे १९४७ च्या कायद्याप्रमाणे पुर्नघटन करणेत आले. प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९२३ च्या कायद्याप्रमाणे शिक्षण मंडळात एकूण १२ सदस्य असतात पैकी ३ स्त्रीयांसाठी राखीव व मागासवर्गीय व मुस्लीमांच्यासाठी ३,४ जागा जनरल साठी व १ सरकारी अधिकारी व इतर साठी १ अशा पध्दतीने सदस्य संख्या होती. शहरातील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीने देणेचे काम नगरपालिका शिक्षण मंडळाकडे सोपविण्यात आले.

नगरपालिका शिक्षण मंडळाने नागरिकांच्या सोईसाठी शाळा सुरु कराव्यात मुलांची जी मातृभाषा असेल त्या मातृभाषेतून त्यांना किमान चौथी पर्यंतचे शिक्षण दयावे.

शिक्षण मंडळाची रचना अधिकारी व पदाधिकारी यांच्या सदस्यत्वाने होते. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ६२ (२) (अ) खाली उपाध्यक्ष हे शिक्षण समितीचे पद्सिध्द सभापती राहतील[१२].

शिक्षण मंडळाचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी खालील प्रशासन यंत्रणा आहे[१४].

शिक्षण संचालक
:
उपशिक्षण संचालक
:
शिक्षणाधिकारी (प्राथमिक जि. प. सातारा)
:
उपशिक्षणाधिकारी
:
गट शिक्षणाधिकारी (प. समिती)
:
शिक्षण विस्तार अधिकारी
:
**प्रशासन अधिकारी व त्याचा कर्मचारी वर्ग**

मा. पी. डी. पाटील हे १-४-१९७७ ते १०-११-१९८० पर्यंत शिक्षण मंडळाचे सभापती होते. त्यानंतर ११-११-१९८० ते २६-१-१९८६ मंदाकिनी श्रीपाद देशपांडे सभापती होत्या व नंतर २७-१-१९८६ ते ५-८-१९८८ दिपक शंकर पेंढारकर सभापती होते. सौ. अनुराधा अधिकराव पाटील ६-८-१९८८ ते २२-६-१९९२ पर्यंत सभापती होत्या व शारदा नारायण गंधे २३-६-१९९२ ते ३१-३-१९९३ पर्यंत शिक्षण मंडळाच्या सभापती होत्या.

शिक्षण मंडळाच्या खर्चासाठी दरवर्षी बजेट मंजुर केले जाते. तत्पूर्वी शिक्षण मंडळाने नगरपालिकेकडे अंदाजपत्रक सादर करावे लागते. प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट प्रमाणे सरकार त्यांना आर्थिक पुरवठा करीत असते.

**शाळा इमारती -**

कराड शहराच्या लोकसंख्येचा विचार केला असता १९५१ साली २५,७२१ लोकसंख्या होती. पुढे मात्र १९६१ ते १९८१ व १९८१ ते १९९१ या कालखंडातील लोकसंख्येचा विचार केला असता, अनुक्रमे ती ५४३५२ वरुन ५६७०५ पर्यंत वाढत गेली असल्याचे दिसून येते[४]. या वाढत्या लोकसंख्ये बरोबर शिक्षण घेणा-या मुलांचीही संख्या वाढत आहे.

शिक्षण जेव्हा जिल्हा परिषदेकडे १९७६ पर्यंत होते. तेव्हा शाळांची अवस्था शोचनीय होती. शहरामध्ये परिषदेच्या मालकीच्या फक्त १२ खोल्या होत्या व शहरातील इतर प्राथमिक शाळा भाडयाच्या इमारती मध्ये भरविल्या जात होत्या. या इमारती गैरसोयीच्या व पडीक अवस्थेत असल्याने प्राथमिक शिक्षणाची मोठी गैरसोय व कुंचबणा होत होती. शहरात त्यावेळी अंदाजे ६००० विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत होते. अशा शाळांमध्ये येणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने गरीब, शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील असत. वस्तूतः त्या काळात प्राथमिक शिक्षणाची कसलीही जबाबदारी नगरपालिकेवर नव्हती. पण ही मुले आपलीच आहेत, अशी विशाल दृष्टी पी.डी.पाटील यांनी स्वीकारुन त्यात पुढाकार घेऊन प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेऊन महाविद्यालयाच्या तोडीच्या प्राथमिक शाळांच्या इमारती बांधल्या.

दि. २४ जुलै, १९६० च्या एका ठरावान्वये प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणेस मंजूरी देऊन त्यासाठी शहरातील नागरीक व सभासद यांची एक सल्लागार समिती नियुक्त केली. या समितीने शहरातील १३ ठिकाणच्या जागा प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्यासाठी सूचविल्या व त्यानंतर हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली. १९६५-६६ मध्ये रु.३,७६,३३८/- खर्च करुन शनिवार पेठ केंद्र शाळा २४ खोल्या, शनिवार पेठ बोरीचे परडे १६ खोल्या, बुधवार पेठ ६ खोल्या अशा तीन शाळांच्या इमारती बांधल्या.

सन १९७१-७२ मध्ये रविवार पेठेत रु.१,३२,४७७/- खर्च करुन १२ खोल्यांची उर्दू माध्यमाची शाळा बांधली.

त्यानंतर नगरपालिकेने स्वतंत्र शिक्षण मंडळाची स्थापना करुन त्यांच्यामार्फत कराड शहरातील प्राथमिक शाळा चालविण्यास सुरुवात केली.

सन १९७५-७६ मध्ये रु.१,७४,३४७/- खर्च करुन मंगळवार पेठ, गणपतीचे परडे येथे ९ खोल्यांची, सन १९७७-७८ मध्ये रु.१,७०,९८६/- खर्च करुन सोमवार पेठेत ८ खोल्यांची, सन १९८१-८२ मध्ये रु.३,४९,४७८/- खर्च करुन रविवार पेठेतील काझी परडयात १२ खोल्यांची, सन १९८२-८३ व १९८४-८५ मध्ये मंगळवार गणपतीचे परडयात रु.४,०९,१६४/- खर्च करुन आदी बांधलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीवर ९ खोल्यांचा पहिला मजला बांधला. सन १९८९-९०-९१ मध्ये उत्तर शनिवार पेठेत ८ खोल्यांची, सन १९९१-९२-९३ मध्ये त्या शाळेचे इमारतीवर ८ खोल्यांचा आणखी एक मजला बांधला. तसेच याच सालात शुक्रवार पेठेत ६ खोल्यांची इमारत बांधून पूर्ण केली.

अशा प्रकारे ११८ खोल्या असलेल्या ९ इमारती प्राथमिक शाळांसाठी बांधून पूर्ण केल्या. प्रत्येक शाळेला क्रिडांगण व स्वच्छतागृहे याची सोय आहे.[१५]

**शाळा संख्या- विद्यार्थी संख्या -**

१९९३ अखेर कराड नगरपालिका शिक्षण मंडळाच्या १० व खाजगी ८ प्राथमिक शाळा होत्या. कराड शहराची लोकसंख्या १९५१ साली २५,७२१ होती. त्यानंतर १९७१ च्या जनगणनेनुसार त्यात वाढ होऊन लोकसंख्या ५६,७०५ झाली. परिणामी लोकसंख्येच्या वाढीप्रमाणे शाळा संख्या व विद्यार्थी संख्येत वाढ झाली. १९७७ साली शाळा संख्या ८ होती व विद्यार्थी संख्या ३८४५ होती.पुढे १९९२ साली शाळा संख्या १२झाली व विद्यार्थी संख्या ४०१३ झाली, खालील तक्ता शाळा संख्या व विद्यार्थी संख्या दर्शवितो.[१५]

| सन | शाळा संख्या | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९५५ | ८ | २३२७ | १३७४ | ३७०१ |
| १९७७ | ८ | १९४२ | १९०३ | ३८४५ |
| १९८८ | ११ | १७१७ | १८०९ | ३५५१ |
| १९९२ | १२ | २०६१ | १९५२ | ४०१३ |
| १९९३ | १२ | १७७० | ३६५९ | ५४२९ |

| सन | न.पा. मालकीच्या शाळांच्या खोल्या. | खाजगी मालकीच्या शाळांची संख्या | इतर, धर्मशाळा, देऊळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९७७ | १४ | ७५ | - | ८९ |
| १९९० | १० | ७७ | २ | ९० |
| १९९३ | १४ | ७५ | १२ | १०१ |

शाळा इमारत भाडयाने घेणे पाठीमागील पुढील कारणे व तोटे सांगता येतील -

१. शाळा इमारत बांधकामासाठी नगरपालिकेला बरीच आर्थिक गुंतवणूक करावी लागते.

२. नगरपालिकेच्या रेकॉर्डवरुन आपल्याला असे निदर्शनास येते की, नगरपालिकेत शाळा इमारत बांधकामापेक्षा शहरातील इतर सुधारणा करणे अधिक गरजेचे आहे.

**तोटे -**

१. इमारत भाडयाची असेल व ती दूर असेल तर गैरहजेरीचे प्रमाण वाढते.

२. एक वर्ग एका ठिकाणी व दुसरा वर्ग दुस-या ठिकाणी असेल तर मुख्याध्यापकांना नियंत्रण ठेवणे कठीण जाते व एकसूत्रता रहात नाही.

३. खाजगी इमारतीत स्वच्छतागृहाची सोय नसल्याने मुलींची संख्या घटते.

४. खाजगी इमारतींना क्रिडांगण उपलब्ध असेलच असे नाही. त्यामुळे मुलांच्या शारीरिक हालचालीवर परिणाम होतो व त्यांच्या अंगी खिलाडूवृत्ती, संघभावना, सहकार्य इ. गुणांचा विकास होत नाही.

तेंव्हा मुलांचा जर बौध्दिक, शारीरिक असा सर्वांगिण विकास व्हायचा असेल तर सर्व सुखसोयींनीयुक्त अशा इमारती असणे आवश्यक आहेत. या गोष्टीकडे कराड नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने विशेष लक्ष पुरविले असल्याने शाळेसाठी योग्य अशा इमारती बांधल्या आहेत.[१७]

**स्त्री शिक्षण -**

जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे यांचे स्वप्न साकार करण्यासाठी कराड नगरपालिकेने मुलींच्या शिक्षणाकडेही लक्ष दिले. मुलींना शिक्षणाची संधी मिळण्यासाठी १ मे, १८६९ रोजी मराठी मुलींची शाळा नं. ४ ची स्थापना केली. या शाळेत सातवीपर्यंत वर्ग चालू केले. या शाळेत १५ शिक्षक, ५२५ मुलींना शिक्षण देत होते.

त्यानंतर १९४२ सालापर्यंत शहरात मुलींची एकच शाळा होती तेंव्हा नागरीकांच्या मदतीने याच साली दुसरी शाळा उघडली. तेथे ११ शिक्षिका ४३५ मुलींना शिक्षण देत.

तसेच मुलींची उर्दू शाळा नं. ६ ची स्थापना १९०९ मध्ये करुन सातवीपर्यंतचे शिक्षण मुलींना दिले. या शाळेत १२ शिक्षिका, ४०० मुली होत्या.[१८]

१९९३ ला मात्र नगरपालिकेच्या सर्व शाळांत मुले व मुलींना एकत्रीत शिक्षण दिले जात असलेचे दिसून येते. १९९३ साली मुलांचे शाळेतील संख्या १७७० होती, तर मुलींचीही संख्या ३६५९ होती.

नगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांतील मुला-मुलींचे प्रमाण पुढीलप्रमाणे-

| सन | मुले | मुली | एकूण | मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९५५ | २३२७ | १३७४ | ३७०१ | ३७.१% |
| १९७७ | १९४२ | १९०३ | ३८४५ | ४९.५% |
| १९८८ | १६०३ | १७६७ | ३३७० | ५२.४% |
| १९९० | १८७८ | १७७५ | ३६५३ | ४८.६% |
| १९९२ | २०६१ | १९५२ | ४०१३ | ४८.६% |
| १९९३ | १८८९ | १७७० | ३६५९ | ४८.४% |

सन १९५५ साली मुलींचे प्रमाण कमी ३७.१% दिसते. पण नंतर ते वाढत गेलेले दिसते. सन १९८८ साली मुलींची संख्या १७६७ व मुलांची संख्या १६०३ आहे. मुलींची संख्या मुलांपेक्षा या ठिकाणी जास्त दिसते. पुढे १९९३ पर्यंत मुलींची संख्या थोडया फार फरकाने मुलांच्या संख्येएवढी आहे. म्हणजेच मुलींच्या शिक्षणाकडेही अधिक लक्ष पुरविले गेलेले दिसते."

**शिक्षक प्रशिक्षण -**

शैक्षणिक क्षेत्रात शिक्षक प्रशिक्षण ही गोष्ट अतिशय महत्वाची मानली जाते. कारण प्रशिक्षित शिक्षक वर्गाकडून परिणामकारक असे शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली जाते आणि त्यामुळेच कराड नगरपालिका शिक्षण मंडळातील जवळजवळ सर्वच शिक्षक वर्ग प्रशिक्षित असलेला पुढील तक्त्यावरुन दिसून येतो.

| सन | पुरुष | स्त्री | प्रशिक्षीत | अप्रशिक्षीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९७७ | २८ | ५९ | ८४ | ३ | ८७ |
| १९७९ | १९ | ५९ | ७४ | ४ | ७८ |
| १९८८ | २० | ५९ | ६८ | १ | ७९ |
| १९९० | १९ | ६१ | ७८ | २ | ८० |
| १९९२ | १४ | ६० | ७१ | ३ | ७४ |
| १९९३ | १५ | ६१ | ७६ | - | ७६ |

सन १९७७-७९ मध्ये अप्रशिक्षीत शिक्षकांची संख्या जास्त दिसते. पण नंतर ती घटलेली दिसते. कारण नगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेत काम करत

असलेल्या अप्रशिक्षीत शिक्षकांना सेवांतर्गत कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठवण्याची तरतूद केली असल्याने ते प्रमाण कमी झालेले दिसून येते.[२०] सन १९९२ ला तर सर्व शिक्षक प्रशिक्षीत असून एकही अप्रशिक्षीत शिक्षक आढळून येत नाही, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावलेला दिसतो.[२१]

**शालेय गुणवत्ता -**

शालेय गुणवत्तेचे मूल्यमापन करत असताना प्रामुख्याने त्या शाळेस शिष्यवृत्ती परीक्षेवर मिळालेल्या गुणवत्तेवर करता येते. राज्य शासनाच्या वतीने सदर परीक्षा घेतली जाते. त्याचा मुख्य उद्देश बुध्दीमान मुलांचा शोध घेणे असा असतो. पण या शिष्यवृत्ती परीक्षेबाबत नगरपालिकेकडील शाळांतून थोडी फार प्रगती दिसून येते. हवी तशी प्रगती मात्र पहावयास मिळत नाही. कारण फक्त शाळा नं. ११ मधील विद्यार्थ्यांना १९९२-९३ मध्ये शिष्यवृत्ती मिळाली आहे, अन्यथा कोणत्याही शाळेस मिळालेली नाही.

अशा प्रकारच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १९७५ साली प्रशासन अधिकारी श्री दरेकर यांनी प्रयत्न करुन तज्ञ शिक्षकांची निवड करुन तास घ्यावयास लावत. यावेळी सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना एकत्र करुन त्या ठिकाणी शिक्षण दिले जाई. त्यानंतर प्रशासन अधिकारी, श्री फाटक यांनीही १९९१-९२ साली असे प्रयत्न केले व जी मुले परीक्षेत यश मिळवतील अशांचा गौरव केला. त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले, मार्गदर्शन करणा-या शिक्षकांना १५०० रु. दिले जातात.[२२]

**राज्य पुरस्कार -**

नगरपालिकेच्या शाळा नं. ९ मधील वसंत बाबूराव लाड यांना सन १९८५-८६ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार मा. राज्यपालांच्या हस्ते मिळाला. तसेच शाळा नं.३ मधील गोरखनाथ मारुती जाधव यांना १९८९-९० साली राज्य पुरस्कार मिळाला.

**आदर्श शिक्षक पुरस्कार -**

शिक्षक दिनादिवशी आदर्श शिक्षकांचा सत्कार नगरपालिकेमार्फत केला जातो. यात दोन नगरपालिका शाळेतील शिक्षक व १ खाजगी शाळेतील शिक्षकांचा समावेश असतो. शिक्षकांना मानचिन्ह दिले जाते. हा खर्च नगरपालिका फंडातून दिला जातो.[२३]

**पूर्व प्राथमिक शिक्षण/ बालवाडी -**

प्राथमिक शिक्षणाबरोबरच नगरपालिकेने पूर्व प्राथमिक शिक्षणालाही महत्व दिलेले आहे. सन १९४८ साली श्रीमती बनुबाई हवालदार यांनी पाच वर्षाच्या आतील मुलांना शिक्षण देणेसाठी बालक मंदीर सुरु केले. यास नगरपालिका १९४८ पासून २०० रु. मदत देत होती. तसेच दादासाहेब अळतेकर यांच्या सहकार्याने श्रीमती आंबर्डेकर व श्री परांजपे यांनी आदर्श शिशु विहार संस्था, १९४८ साली सुरु केली. त्यास नगरपालिका १९४९ सालापासून रु. २००/- मदत देते.[२४]

शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी कराड नगरपालिकेने बालवाडयांवरही भर दिला. नगरपालिकेने ज.क.ठ.नं. २/१० नुसार सन १९८३ साली प्रथम चार बालवाडया सुरु केल्या.[२५]

पूर्व प्राथमिक शाळा सुरु करणेबाबतचा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, कराड यांचे आलेले दि. १०.७.१९८५ चे पत्र व त्याबाबत मुख्याधिकारी यांचेकडून आलेला ऑफिस रिपोर्ट आदि कागदपत्र पाहिले. त्यानुसार सन १९८५ साली आणखी १२ बालवाडया सुरु करण्यात आल्या. सध्या एकूण २५ बालवाडया सुरु आहेत. त्या प्राथमिक शाळांच्या इमारतीत भरतात. शिवाय बालवाडीसाठी एक आदर्श अशी स्वतंत्र इमारत बांधली आहे. तसेच रु.२०,०००/-

खर्च करुन प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र खेळणी, मुलांना बसणेसाठी बसकरे, खडू, फळा नगरपालिका पुरविते.

मा. सभापती, शिक्षण समिती, कराड नगरपरिषद यांच्यामार्फत २५ प्रशिक्षित शिक्षीका व २५ आयांची नेमणूक केलेली आहे. १९८५-८६ साली शिक्षीकांना दरमहा १५० व आयांना दरमहा रु.५०/- वेतन दिले जात असे. त्यात पुढे वाढ करुन शिक्षीका ५०० व आयांना रु.३००/- वेतन दिले जाते. या बालवाडींना शासकीय कोणतीही मदत मिळत नाही. तरी नगरपरिषद विनाअनुदानित तत्वावर चालवते व सर्व नगरपालिका स्वतःच्या फंडातून करते.[१५]

नगरपरिषद बालवाडीतील मुलांसाठी खाऊ, खेळणी व इतर सुविधा पुरवण्यासाठी खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केली जाते. अशा खर्चाचे बजेट सन १९८७-८८ साली रु.५०,०००/- होते तर १९९२-९३ साली ८१,६६१/- रु. खर्च निव्वळ बालवाडयांवर केला.[१७]

तसेच कराड शहरातील बुधवार पेठेतील मातोश्री महिला मंडळाने चालविलेल्या बालवाडीस अनुदान द्यावे याबद्दल प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, कराड यांचे प.न. जा. शिक्षण ६११/६१२/८१-८२ कराड नगरपरिषद शिक्षण मंडळ ठराव नं.५/३६ दि. २.१२.१९८१ ची नक्कल व हेड क्लार्क रिपोर्ट असे कागदपत्र पाहिले. सदर बालवाडीतील सर्व मुले मागासवर्गीय जमातीतील असलेने त्यांच्या कल्याणासाठी चेअरमन, शिक्षण मंडळ, कराड यांनी शिफारस करुन ठराव पास केला. सदर विद्यार्थ्यांकरिता रक्कमेचे अनुदान देणेऐवजी त्यांना उपयुक्त पडतील असे शिक्षण साहित्य, युनिफॉर्म यासाठी खर्च म्हणून रु. ७७/- रक्कमेस मंजूरी दिली.[१८]

**शैक्षणिक क्षेत्रातील इतर उपक्रम -**

क्रीडा स्पर्धा -

नगरपालिका शाळांतून बालकांच्या बौध्दिक, शारीरिक अशा सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्न केला जातो व त्यातून विविध स्पर्धांचे आयोजन करुन तो साधला जातो. स्वतंत्र्या दिनी, प्रजासत्ताक दिनी तसेच साने गुरुजी जन्मशताब्दी दिवशी विविध स्पर्धांचे नियोजनकरुन खो-खो, कबड्डी, लंगडी, रांगोळी इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच यशवंतराव चव्हाण, श्री. म. माटे यांचे जन्मशताब्दी दिवशी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाते. मुलांना योगय ते बक्षीस देऊन त्यांचा सत्कार नगरपालिकेमार्फत केला जातो व त्यांना प्रोत्साहन दिले जाते. खेळासाठी जे साहित्य खरेदी करावयाचे असते त्यासाठी नगरपालिका शिक्षण मंडळाकडून खर्च दिला जातो. लेझीम, दोरी, बँड, ढोल, चेंडू पुरविले जातात.

केवळ विद्यार्थ्यांसाठीच स्पर्धांचे आयोजन केले जाते असे नाही तर १९८६-८७ साली नगरपालिका प्रशासन अधिकारी, भुजबळ यांनी शिक्षकांच्याही स्पर्धा आयोजित केल्या. यामध्ये शाळा नं. ९ मधील शिक्षकांचा रांगोळी, लिंबू चमचा यामध्ये नंबर आला. या स्पर्धांत नगरपालिका शाळा व खाजगी शाळांचा सहभाग असतो.

शिक्षक दिन -

५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी नगरपालिका शिक्षण मंडळ सभापती, नगराध्यक्ष, नगरसेवक हे हजर राहून निवृत्त शिक्षक व सध्या नोकरीवर असलेल्या शिक्षकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. आदर्श शिक्षक पुरस्कार याच दिवशी नगरपालिका शिक्षण मंडळाकडून दिला जातो.

सांस्कृतिक कार्यक्रम -

नगरपालिकेच्या सर्व शाळांतून महापुरुष, समाजसुधारक यांच्या जयंती व पुण्यतिथी साज-या केल्या जातात. महात्मा गांधी, फुले, आंबेडकर, सुभाषचंद्र बोस, पं.नेहरु, डॉ. राधाकृष्णन, यशवंतराव चव्हाण इ. नेत्यांच्या थोर कार्यांची ओळख करुन देऊन त्यांच्या व्यक्तीमत्वाचा ठसा मुलांच्या मनावर या विविध कार्यांद्वारे उमटविला जातो.

तसेच स्वतंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन साजरे करुन मुलांच्यात राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, एकात्मता, बंधुभाव इ. संस्कार केले जातात.

शिक्षक पालक संघ -

नगरपालिका शिक्षण मंडळाने राबवलेल्या सर्व उपक्रमांपैकी अतिशय महत्वाचा हा उपक्रम आहे. शिक्षक पालक संघाची स्थापना १९८६ साली झाली. शिक्षण मंडळाच्या सभापती मंदाकिनी आप्पासाहेब देशपांडे यांनी स्थापना केली. याद्वारे विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक, अभ्यासविषयक माहिती पालकांना दिली जाते. तसेच विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे नेमके कारण शोधले जाते. पालकांच्या समस्या विचारात घेतल्या जातात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल पालकांना मार्गदर्शन केले जाते. शिक्षक पालक संघाचा मुख्य उद्देश शिक्षक व पालक दोघांच्या सहविचारातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. शिक्षक पालक संघ तीन महिन्यातून एकदा घेतला जातो.

प्रदर्शन -

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या मनात अनेक गोष्टींविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी अनेक प्रदर्शने भरविली जातात. यात विज्ञान, प्रदर्शन, शैक्षणिक साहित्य प्रदर्शन भरविली जातात.

कब-बुलबुल -

नगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेत १९८२ पासून कब-बुलबुल पथक सुरु झाले. याद्वारे सुप्तगुणांना वाव, स्वावलंबन, शिस्त, एकमेकांना सहकार्य, वेळेचे महत्व, राष्ट्रीयत्वाची भावना इ. गोष्टी आत्मसात केल्या जातात. शिवाजी स्टेडीयम, टिळक हायस्कूलवरती घेतली जातात. तसेच १९८६-८७ साली खोडशी येथे कब-बुलबुल मेळावा झाला. प्रत्येक शाळेत तीन क्रमांक काढले जातात. यात खाजगी शाळा व नगरपालिका शाळा यांचा समावेश केला जातो.[२९]

सावित्रीबाई फुले दत्तक योजना -

नगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत सावित्रीबाई फुले दत्तक योजना राबवली जाते. दोन शिक्षकात एक विद्यार्थी घेतला जातो. ३६० रु. रक्कम शिक्षकाकडून दिली जाते. शाळा नं. ९ मधील सुमन पवार शिक्षीकेने या कामी ३००० रु. जिल्हा निधी भरुन विद्यार्थी दत्तक घेतला आहे. ही एक उत्तम योजना आहे.[३०]

ग्रंथालय -

नगरपालिका शिक्षण मंडळाकडून प्रत्येक शाळांना क्रमिक पुस्तके, गोष्टीची पुस्तके, साने गुरुजी, यशवंतराव चव्हाण, थोर नेत्यांची पुस्तके, जीवन शिक्षण मासिक इ. पुस्तके पुरविली जातात.

शैक्षणिक साधने -

शैक्षणिक क्षेत्रात परिणामकारक शिक्षण होण्यासाठी व मुलांचे अवधान टिकवून ठेवण्यासाठी दृक-श्राव्य साधनांना अतिशय महत्व आहे. अध्यापन व अध्ययन या दोन्ही क्रिया परिणामकारक व्हायच्या असतील तर शैक्षणिक साधने वापरणे गरजेचे

असते. मानसशास्त्रीय तत्वाने शाब्दिक वर्णनापेक्षा शैक्षणिक साधने वापरल्याने डोळा व कान या ज्ञानेंद्रियांना प्रशिक्षण मिळते.

हे शैक्षणिक साधनाचे महत्व ओळखून प्रत्येक शाळांना नकाशे, तक्ते, ब्लॅक बोर्ड, मॉडेल्स, शास्त्रीय उपकरणे, वर्तमानपत्रे, मासिके, सुक्ष्मदर्शिका, इ. साहित्य पुरविले जाते. तसेच काही शैक्षणिक साधने शिक्षकांनीही तयार केली आहेत.[११]

साक्षरता प्रसार -

नगरपालिका शाळेतील शिक्षक प्रत्येक वॉर्डमध्ये १५ शिक्षक साक्षरतेचे काम करतात. एकूण १६८४ निरक्षरपैकी वर्गात दाखल होणारे पुरुष, ४५० स्त्रिया ११११ आहेत. वर्गांची संख्या १६८ व स्वयंसेवक संख्या पुरुष ५६ व स्त्रिया ११२, एकूण १६८ लोक आहेत.[१२]

इतर उपक्रम -

झाडे लावणे, वृक्षदिंडी, साक्षरता दिन फेरी काढली जाते. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात मासिके तयार करणे, आरोग्य तपासणी इ. उपक्रम राबविले जातात.[१३]

**शिक्षणावरील खर्च -**

नगरपालिकेने आपल्या अंदाजपत्रकात शिक्षणावर ब-याच प्रमाणात खर्च केलेला आहे हे दिसून येते. सन १९७६ ते १९९३ पर्यंत पुढीलप्रमाणे खर्च केला[१४] -

| सन | नगरपरिषदेकडे जमा झालेले प्राथमिक शिक्षक अनुदान | शिक्षण मंडळास वेळोवेळी अदा केलेल्या रक्कमा |
|---|---|---|
| १९७६-७७ | २७९२०० | २८९८०६ |
| १९७७-७८ | ६१४६०० | ६४३९१५ |
| १९७८-७९ | ६५००० | ६९८९७३ |
| १९७९-८० | ८३८६८५० | १४५१९८२ |
| १९८१-८२ | १४३७१५५ | १४५१९८२ |
| १९८२-८३ | १७०७४५० | ११९४८९२ |
| १९८३-८४ | १९९५२५० | १७६६२२४ |
| १९८४-८५ | २२९८८७० | २३९६७०० |
| १९८५-८६ | २४४३६९५ | २६३८५८७ |
| १९८६-८७ | २८७०५५५ | २९८५००० |
| १९८७-८८ | २५६७००० | २४९५५०० |
| १९८८-८९ | ३२७१६६० | ३६९५३७५ |
| १९८९-९० | ४४२३६८९ | ४७१७००० |
| १९९०-९१ | ४२८८८२८ | ४२८८८२८ |
| १९९१-९२ | ४९९१२८९ | ४९९१२८९ |
| १९९२-९३ | ५४८१३३६ | ५४८१३३६ |

**कराड नगरपालिका वाचनालय -**

नगरपालिका वाचनालय कराड ही संस्था ग्रंथालय चळवळीतील एक अग्रेसर आणि दक्षिण महाराषट्रातील ग्रंथप्रेमी वाचकांनी मान्य केलेली जेष्ठ संस्था मानली जाते.

त्यामुळे नगर वाचनालय कराडची शान बनले आहे. भरपूर ग्रंथ संख्या, त्याची शिस्तबध्द व शास्त्रोक्त मांडणी, दुर्मिळ साहित्याची व संदर्भ ग्रंथाची उपलब्धता यामुळे हे ग्रंथालय महाराष्ट्रभर ओळखले जाते. तसे हे ग्रंथालय १८५७ मध्ये 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' या नावाने सुरु झाले.[३५]

तेंव्हापासून आजही आपल्या अखंड सेवेने, तत्परतेने, विविधतेने वाचकांची जिज्ञासूची व अभ्यासूची वाचनाची भूक भागवते आहे.

१८५७ नंतर पुढे कराड शहर शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्तरावर वेगाने धाव घेत असताना मात्र शहरातील चावडी चौकातील चावडीच्या पडक्या अपु-या आणि अडचणीच्या जागेत हे वाचनालय उभे होते. शेवटी १९५२ मध्ये वाचनालय नगरपालिकेच्या ताब्यात दिले तेंव्हा फक्त ३३७ पुस्तके होती. परंतु त्यावेळचे सकाळचे बातमीदार श्री. म. कुलकर्णी, शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शंकरराव करंबळेकर आणि कराडचे भूषण असणारे मा. पी.डी. पाटील यांनी आपल्या अथक परिश्रमाने, नियोजनाने, जनसंपर्काने आणि एकमेकांच्या सहकार्याने वाचनालयाचे स्वरुप बदलून गेले.

चावडी चौकातल्या पडक्या इमारतीमधून हे वाचनालय नगरपालिकेने रविवार पेठेतल्या पाण्याच्या टाकीखालच्या त्यावेळच्या नगरपालिका कार्यालयात आणले आणि या इमारतीत ते १९६२ पर्यंत होते. हा कालावधी कराडच्या दृष्टीने खूपच महत्वाचा आहे. कारण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रेरणेने, शासकीय अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र व इतर महाविद्यालये येथे सुरु झाली. कराडच्या शैक्षणिक क्रांतीस प्रारंभ झाला व ग्रंथालयाचा कायापालट होण्यास सुरुवात झाली. १९६४-६५ सालापासून नगरपालिकेच्या अंदाजपत्रकात ग्रंथालयाच्या वार्षिक खर्चासाठी पी.डी. पाटीलनी स्वतंत्र अशी भरीव रक्कमेची तरतूद करण्यास सुरुवात

केली. त्यामुळे नवनवीन ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके यांच्या संख्येत भरीव वाढ होत गेली.[३६]

वाचनालयात एक लिपीक व एक शिपाई एवढेच कर्मचारी होते व वर्गणीदारांची संख्या १४० होती. वर्गणी दरमहा ३७ पैसे अशी नाममात्र होती. वाचनालयात १४ दैनिके, १५ साप्ताहिके, ५ पाक्षिके व ३४ मासिके येत होती. यानंतर मात्र नगराध्यक्ष पी.डी. पाटील यांनी ग्रंथालयाचे शहराच्या बौध्दिक विकासातील एकूण महत्व लक्षात घेऊन सहाय्यक ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सहकार्याने एक योजना आखली व तिच्या कार्यवाहीस सुरुवात केली व तीची जबाबदारी सकाळचे बातमीदार ना. वा. ढवळे, आर.पी. कुलकर्णी यांच्यावर सोपविली. १९६२ मध्ये प्रथमत ग्रंथपालची नियुक्ती केली आणि नंतर १९६४ मध्ये हे ग्रंथालय नगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या माडीवरील विंगमध्ये हलविण्यात आले. १९६२- १४० वर्गणीदार असलेल्या ग्रंथालयाच्या वर्गणीदारांची संख्या १९७१ मध्ये ७४९ झाली व १७,६३९ ग्रंथ जमा झाले. ग्रंथालयाने १९७१ पर्यंत या ग्रंथालयाचा उपयोग करुन जवळजवळ ७ संशोधकांना पीएच.डी. पदवी मिळण्यास मदत झाली. ग्रंथालयात विविध विद्याशाखेतील ग्रंथ, संदर्भ ग्रंथांची विविधता म्हणजे अगदी तत्वज्ञानापासून शेती-बागायती, अंतराळ, विज्ञान, कला, इतिहास, तंत्रज्ञान येथपर्यंत मौल्यवान ग्रंथांची व नियतकालिकांची त्यात भर पडत आहे.

नगरपालिकेने १९७१ ते १९८५ ग्रंथालयात झपाटयाने प्रगती केली. १९८५ मध्ये ४०,८७५ एवढी ग्रंथसंख्या झाली. ३,४८१ वर्गणीदार झाले. १९८५ अखेर रु.११ लाख किंमतीची पुस्तके ठेवली. वाचनालयाचा विस्तार वाढत गेल्याने जुनी जागा अपुरी पडू लागली.[३७]

तेंव्हा टाऊन प्लॅनिंग स्कीम कराड नं.१ ही १.१.१९६२ रोजी अंमलात आलेली होती. त्यानंसार त्यामध्ये सामील झालेल्या रि.स.नं. ८१७, सि.स.नं. ११७ व सि.स.नं. ९५ ही जागा सामील झाली व ती नगरपालिकेस साईट सी, लायब्ररी, टाऊन हॉल व गार्डन म्हणून अलॉट करण्यात आली. ती पूर्णपणे नगरपालिकेच्या मालकीची झाली. या ठिकाणी इमारत बांधणेकामी 'आर्किटेक्ट युनायटेड, पुणे' यांनी तयार केलेले प्लॅन्स व एस्टीमेट मा.ज.क.ठ.नं. ५/४१ ता.१४.९.१९७३ ने मंजूरी दिली."[14]

१९८७ साली 'यशवंतराव चव्हाण स्मृती सदन' या कराडच्या भव्य दिव्य पवित्र वास्तूचे उद्घाटन झाले व वाचनालयास यापैकी ३५ x २५ फूटाची चार हक्काची दालने देण्यात आली. नगर वाचनालयाचा पुस्तक विभाग तळमजल्यावर १०७ x ५७ फूट रुंद आहे. त्यामध्ये सुमारे २ लाख पुस्तके ठेवता येतील. त्यामध्ये सध्या निम्या भागात वाचण्याची सोय आहे. त्याशिवाय जोडूनच दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके आदीच्या वाचनासाठी ३५ x ३५ या मापाची स्वतंत्र चार दालने बांधण्यात आली आहेत. त्यात महिला व बाल विभाग याची स्वतंत्र सोय आहे. ग्रंथालयाच्या पुढील बाजूस ८० x २४ फूट मापाचे कलादालन बांधले आहे. त्यात प्रामुख्याने कला प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन भरविण्याची सोय आहे.

ग्रंथालयात अद्यावत फर्निचर आहे. यशवंतराव चवहाण साहित्य दालन आहे. त्यात यशवंतरावजींनी लिहिलेले साहित्य, त्यांच्यावर आणि त्यांच्या साहित्यावर इतरांनी लिहिलेल्या प्रकाशित केलेल्या साहित्याचे स्वतंत्र दालन आहे. ग्रंथ, भाषणे, आठवणी, मुलाखती, संपादकीय अग्रलेख, काव्यविशेष प्रसंगी प्रकाशित झालेले विशेषांक यशवंतरावजींनी निरनिराळया ग्रंथांना लिहिलेल्या अभ्यासपूर्ण प्रस्तावना, साहित्य, परीक्षणे, समालोचने, त्याच्या विधानसभेतील इंग्रजी, मराठी भाषणांचा संग्रह, इ. साहित्यांचा त्यात समावेश आहे."

तसेच वाचनालयातर्फे - शारदीय, साने गुरुजी व यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला राबविण्यात येते व सर्व वक्त्यांची भाषणे पुस्तकरुपाने प्रकाशीत करून वाचनालयात ठेवली जातात.

त्याचप्रमाणे कलकत्याच्या 'राजाराम मोहनरॉय' ग्रंथ प्रतिष्ठानद्वारे दरवर्षी मिळणा-या ७० ते ८० पुस्तकांच्याद्वारे वाचनालयाने साखळी योजना चालू ठेवली आहे. वाचनालयात १९०३ पासूनचे अंक, १०० वर्षापूर्वीची जुनी पंचांगे, १९३२ पासूनचे कल्याण मासिके अंक, रत्नावलीचे सर्व अंक जतन करुन ठेवले आहेत."

**ग्रंथालयाची १९५२ ते १९९४ पर्यंतची प्रगती**

| वर्ष | ग्रंथ संख्या | वर्गणीदार | दैनिके | साप्ताहिके | पाक्षिके | मासिके |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५२ | ३३७ | ६३ | ६ | ५ | २ | १६ |
| १९६२ | २२४५ | १४० | १४ | १५ | ५ | ३४ |
| १९७१ | १७६२९ | ७४९ | २४ | ४१ | १३ | १४९ |
| १९८५ | ४०८७५ | ३४८१ | ३० | ६२ | १९ | १६९ |
| १९९३ | ४४७८० | ५००० | २८ | - | - | - |

१९९३ मध्ये ३२२७१ मराठी, १४१६ हिंदी, ९७४९ इंग्रजी, ३६ संस्कृत, १००२ उर्दू, १४८ कन्नड पुस्तके ग्रंथालयात आहेत."

ग्रंथालयातील पुस्तकाचे वर्गीकरण डयुई दशांश वर्गीकरण पध्दतीने केलेले आहे व ते अे अेल कॅटलॉग कोडप्रमाणे तालीकरण केलेले आहे. दररोज ३०० ते ४०० ग्रंथाची देवघेव होते. तसेच ग्रंथालयातील वाचन कक्षात बसून वाचण्यासाठी

(5)

२८३-५८

जा. क्र. का/३[२]/आंबे./८८-८९
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
नगर भवन, मुंबई-२३.
दिनांक : ११/४/८८

प्रति,
अध्यक्ष/सेक्रेटरी,
नगर पालिका नगर वाचनालय,
कराड, ता. कराड
जि० सातारा

विषय :- महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय योजना.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार १९८८

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, आपल्या ग्रंथालयास महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय योजनेअंतर्गत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार" दि. १४ ऐप्रिल एप्रिल, १९८८ रोजी रविंद्र नाट्यमंदीर येथे सकाळी ११ वाजता देण्यात येणार आहे. संचालनालयातर्फे आपले हार्दिक अभिनंदन.

सदरहू पुरस्कार स्वीकारण्यासाठी आपल्या ग्रंथालयातील ग्रंथपाल किंवा अध्यक्ष किंवा कार्यवाह यांनी ठीक ११ वाजता समारंभ स्थळी उपस्थित रहावे. शासकीय नियमानुसार फक्त एका प्रतिनिधीचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. प्रतिनिधींना आपली भोजन व निवासव्यवस्था स्वतंत्र करावी लागेल.

आपला विश्वासू,

ग्रंथालय संचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कराड म्युनिसिपल कौन्सिल
आवक नं. ३४७
दि. 13 APR 1988
उमुबा/-८५८८.

१३/४
१३/४

२०० चे वर ग्रंथाची देवघेव होते. वाचकाचे घरी पुस्तक नेणेसाठी मासिक वर्गणी अल्प म्हणजे १ रुपया घेतली जाते. प्रतिवर्षी १०० चे वर सर्व प्रकारचे दिवाळी विशेषांक ग्रंथालयात बसून मोफत वाचनाची सोय आहे.

पीएच.डी., एम.फिल. संशोधकासाठी स्वतंत्र अभ्यास कक्षेची सोय आहे. या ग्रंथालयाचा उपयोग करुन ७ अभ्यासकांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.

ग्रंथालयाचे ग्रंथ देवघेव विभाग, वाचन विभाग, बाल विभाग, अभ्यासिका, वर्तमानपत्र विभाग पाडले आहेत. ग्रंथालयात जुन्या नियतकालिकांचे तीन हजारावर बांधीव ग्रंथ अंक उपलब्ध आहेत.[४१]

**ग्रंथालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार -**

कराड नगरपालिका ग्रंथालयास महाराष्ट्र राज्यातील 'अ' वर्गातील सर्वोत्कृष्ट शहरी सार्वजनिक ग्रंथालय म्हणून सन १९८८-८९ चा महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळाला आहे.[४२]

**व्याख्यानमाला -**

ग्रंथ समृध्दी बरोबरच वाचनालयाने सांस्कृतिक वाङ्.मयीन चळवळीसाठी प्रतिवर्षी काही उपक्रमांचे नियोजन केले आहे. यात तीन व्याख्यानमाला, १९३२ नवरात्रमध्ये शारदीय व्याख्यानमाला सुरु करुन अखंडपणे चालू ठेवली आहे.

तसेच १९७२ पासून साने गुरुजी कथामाला सुरु केली आहे. यातून बालकांच्या सुप्त गुणांच्या विकासाला वाव दिला आहे. तसेच आदरणीय यशवंतरावजी चव्हाण यांनी चालविलेले समाज प्रबोधनाचे व परिवर्तनाचे कार्य सतत तेवत रहावे यासाठी १९७३ पासून 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' सुरु केली व विचारवंतांच्या भाषणाचे पुस्तकरुपाने प्रकाशित केले. १९७९ चे पुस्तक शिवाजी

विद्यापीठाने प्रकाशित व सन १९८० चे पुस्तक मुंबई विद्यापीठाने एम.ए. ला वाचनासाठी नियुक्त केले.[४४]

याशिवाय वाचनालयातर्फे वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, परिसंवाद, ग्रंथ प्रदर्शन इ. उपक्रम राबवले जातात.

अशाप्रकारे कराड नगरपालिकेने उत्कृष्ट ग्रंथांच्या सहाय्याने वाचकांची आवड पूर्ण करुन त्यांच्या ज्ञानात मोलाची भर घालण्याचे कार्य अतिशय महत्वपूर्णपणे पार पाडले आहे.

**कराड नगरपालिका- व्याख्यानमाला -**

कराड नगरपालिकेने सांस्कृतिक कार्यक्रमातही महत्वाचा वाटा उचलला आहे. वाचनालयाच्या वाचक सदस्यांची आणि सर्वसाधणारण कराडकर नागरीकांची अभिरुची अधिक संवर्धित व्हावी म्हणून सन १९३२ सालापासून ते आजअखेर महाराष्ट्रातील नामवंत विद्वान व त्या त्या विषयातील तज्ञ व्यक्तींनी भाग घेऊन ही व्याख्यानमाला अवघ्या महाराष्ट्रात मनपसंत व्याख्यानमाला म्हणून ओळखली जाते.

व्याख्यानमालेत तीन विभाग पाडलेले आहेत -

१. शारदीय व्याख्यानमाला

२. साने गुरुजी कथामाला

३. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

**शारदीय व्याख्यानमाला -**

सन १९३२ सालापासून नवरात्रामध्ये शारदीय व्याख्यानमाला अखंडपणे चालू केली. सन १९६१ पर्यंत ती गावातील लोकांमार्फत आयोजित केली जात असे. पण

नंतर नगरपालिका तीचे पूर्ण नियोजन करीत आली आहे. १९३२ साली लहान प्रमाणात श्री ना.ना. बुधकर, श्री रा.द. सुपनेकर, भाई डांगे, भाई चितळे, पा.न. गाडगीळ, तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, माधव ज्युलियन, डॉ. अ.स. आळतेकर, वा.दा. गोखले इ. प्रभृति व्याख्यात्यांची व्याख्याने झाली. उत्सवातील व्याख्यानांचा सारांश पुस्तकरुपाने प्रसिध्द करण्यासाठी कै. शेठ किसनलाल प्रेमराज यांचे चिरंजीव शेठ रामबिलास यांनी काढलेल्या धर्मादाय निधीतून शंभर रुपये देणगी दिली. तसेच बाबूराव गोखलेंनी पन्नास रुपये व म्युनिसीपलटी व नागरीकांनी सक्रीय मदत केली होती.

शारदीय व्याख्यानमालेत १९३५ साली भाई डांगे, सन १९६२-६३ साली यदुनाथ थत्ते (पुणे), १९६३-६४ ना.ग. गोरे व गो.म. कुलकर्णी, १९६८ रणजीत देसाई, १९६९ श्रीमान योगी दत्ता बाळ, १९७० प्रा.ल.ग. जोशी, १९७३- डॉ. अंबादास माडगूळकर, १९४७- रा.सू. गवई; १९७६- बाबा कदम, १९७७ - प्रा. राम शेवाळकर, सन १९८८- प्रा. देवदत्त दाभोळकर इ. विविध प्रसिध्द विद्वान व इतर व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली.[४५]

### साने गुरुजी कथामाला -

सन १९७२ पासून साने गुरुजी कथामाला सुरु केली. दरवर्षी डिसेंबरमध्ये तीन ते चार दिवस या कथामालेचे कार्यक्रम होतात. साने गुरुजींच्या गोष्टी कथा अभिनय गीते, बडबड गीते, नाट्य प्रवेश यातून मुलांच्या सुप्त गुणांच्या विकासाला वाव दिला जातो. बालक आणि पालक या दोघातही ही कथामाला प्रिय झाली आहे.[४६]

### यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला -

साहित्य, सौंदर्य, संगीत क्रीडा, करमणूक या समाज जीवनाला समाधान देणा-या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिका यासंदर्भात

कराडची एक वैशिष्टयपूर्ण अभिरुची निर्माण केली आहे. त्याचबरोबर आजच्या गतिमान कालखंडात नव्या पिढीतील समाज घटकात चिकित्सक नि अभ्यासूवृत्ती वाढीस लागावी, सामाजिक, राजकीय, आर्थिक, समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा ही निकडीची गरज आहे. समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असते. एका प्रयत्नवादी अभ्यासू नि यशस्वी अशा सर्व स्पर्शी व्यक्तीमत्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे जन जागरणाचे, संस्काराचे कार्य आरंभिले आहे."[४७]

कराडचे सुपूत्र आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे उपपंतप्रधान मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे नेत्रदीपक व्यक्तिमत्व आणि विशेषतः त्यांचे विचार नि उच्चारांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा व समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने मा.यशवंतराव चव्हाणांच्या नावाने सन १९७३ सालापासून 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली. काही विचारवंतांच्या सूचनेवरुन या व्याख्यानमालेतील अभ्यासपूर्ण व्याख्याने पुस्तक रुपाने प्रकाशित करण्यात येऊ लागली."[४८]

जन्मता पारंपारिक, सामाजिक किंवा आर्थिक सुबकतेचे वा प्रतिष्ठेचे आवरण यशवंतरावजींना लाभले नाही. प्रतिकूलतेची पाठशिवणी सतत चालू असताना, आत्मविश्वासाने, अभ्यासू वृत्तीने त्यांनी आपले 'ज्ञानदालन' प्रयत्नपूर्वक समृध्द केले. ध्येयपूर्तीसाठी ठामपणे उभे राहून अविचल मनोनिग्रहाने त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कतृत्वाची साक्ष पटवली आहे. आकांक्षेकडे झेप घेणारी निष्ठा, वाणी, करणी त्यांच्या विद्यार्थी दशेतील साधना आहे. म्हणूनच नव्या पिढीने त्यांच्या व्यासंगाचा नि प्रयत्नवादाचा अभ्यास केला पाहिजे असे वाटते.

राजकारण असो समाजकारण असो, अर्थकारण असो, कोणत्याही गंभीर समस्यांचे विचार एकाग्रतेने करावा. आपल्या सहकारी मित्रांबरोबर साधकबाधक चर्चा करावी आणि भावनावश न होता जो निर्णय तर्कशुध्द व वस्तुनिष्ठ आहे तो शिरोधार्य मानून कोणत्याही परिणामाची मुलाहिजा न ठेवता त्याचा पाठपुरावा करावा हा यशवंतराव चव्हाणांचा स्वभावविशेष होता.

भारतीय सामाजिक नि राजकीय क्षेत्रात ते एक विचार म्हणून गौरवले जातात. पण ही त्यांना लाभलेली ईश्वरदत्त गोष्ट नाही. त्यांचा हा होणारा गौरव त्यांनी सतत व्यासंगाने, चिकित्सक वृत्तने नि अभ्यासाने आत्मसात केलेली साधना आहे. या विज्ञान युगातील गणक यंत्रातून बाहेर पडणारे बिनचूक उत्तराइतके अचूक निर्णायक उत्तर स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी त्यांच्या प्रज्ञेचा चमत्कार वाटतो. राजकारणातील अत्यंत नाजूक नि अत्यंत कठीण प्रसंगी अनेक वेळा त्याचा पडताळा आला होता.

परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची त्यांची तयारी स्वतःच्या व्यासंगावरील नि अभ्यास धारणेवरील जबरदस्त विश्वासच मुंबई राज्याची, महाराष्ट्र राज्याचा नि भारताच्या राजकारणातील त्यांच्या धाडशी भूमिकांची ओळख सर्वांनाच जवळून झालेली होती. पंडितांच्या सभेत तर्कशुध्द नि समर्पक दाखल्यांनी बिनतोड युक्तिवाद करणारी त्यांची भाषाशैली राजकीय किंवा सामाजिक लेणे घेऊन जनसामान्यांच्या मनाचा कब्जा करते.

यशवंतराव चव्हाण यांचा जीवनलेख चढता वाढता आहे पण तो त्यांनी अनुभवलेल्या सामाजिक, राजकीय क्रिया-प्रतिक्रियांचा परिपाक होता."

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला सुरु केली ती ग्रिनीज बुकात नोंद झालेले माजी नगराध्यक्ष मा.श्री पी.डी. पाटील व त्यांच्या सहका-यांनी. यात पी.डी. पाटील यांची योजकता व समयसूचकता सिध्द होते.

विचारावर जीवापाड प्रेम करणा-या विचारवंतांची जीवन चरित्रे नेहमी प्रेरक व मार्गदर्शक असतात. अखिल विश्वविरुध्द झगडण्याची क्षमता असलेल्या त्या विचारवंतांच्या विचार वैभवाने आपण ढिगमूढ होतो. विवेक निष्ठेचा आग्रह धरणाराची आपल्या देशातील परंपरा ज्या थोडया लोकांनी जतन केली आहे, त्यात यशवंतरावजी अग्रणी होते. लोकशाही ही एक केवळ राजकीय प्रणाली नसून ती सर्वव्यापी अशी संकल्पना आहे. ती जीवननिष्ठा झाली पाहिजे. पण भारतीय जाती व्यवस्था आणि लोकशाही यातील आंतरिक विसंगती नष्ट करणे हे त्यांनी आपले महत्वाचे उद्दिष्ट मानले होते. तेच ध्येय या व्याख्यानमालेच्या आयोजनामागे आहे.

विचाराने माणसे निर्भय बनतात, त्यांचा आत्मविश्वास वाढतो, समस्येच्या मुळाशी जाण्याची तर्कशुध्द विचार करण्याची, तो बोलून दाखविण्याची, कृतीत उतरविण्याची आणि त्यातून समाज देश यांचा अभ्युदयासाठी झगडण्याची तळमळ लोकांमध्ये वाढावी हे या व्याख्यानमालेचे उद्दिष्ट आहे.

व्याख्यानातून केवळ यशवंतरावांच्या जीवनचरित्राची चर्चा होत रहावी हा प्रधान हेतू मुळीच नाही तर आज भारतीय समाजाच्या राष्ट्रीय जीवनाच्या ज्या समस्या आव्हानाचे स्वरुप घेऊन आपल्यापुढे उभ्या राहिल्या आहेत. त्या सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह अधिकारी व्यक्तीच्या नियोजित व्याख्यानातून व्हावा हाच प्रधान हेतू आहे.

विविध ठिकाणाहून मोठे मोठे विचारवंत नगरपालिकेच्या आमंत्रणानुसार कराड येथे येतात. आपले विचार प्रस्तुत करतात. नगरपालिकाही त्या विचारांचे संकलन पैसाखर्च करुन पुस्तकरुपाने ते विचार करते.[५०]

शारदीय व्याख्यानमालेप्रमाणे यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत अनेक विद्वान व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. यात सन १९७५- डॉ. भा.श. भणगे, १९७८- डॉ. भालचंद्र फडके, १९८१- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, १९८३- बॅ.पी.जी. पाटील, १९९०- राम जोशी, १९९१- प्रा. मे. पु. रेगे, १९९२- डॉ. भा.ल. भोळे यांच्याशिवाय अनेक विद्वान व्याख्यात्यांची व्याखने आयोजित केली जात.[५१]

**व्याख्यानमाला खर्च -**

कराड नगरपालिकेमार्फत व्याख्यात्यांना येणे-जाणे, राहणे व त्यांचे मानधन हा सर्व खर्च पहावा लागतो. त्यासाठी नगरपालिकेच्या अंदाजपत्रकात या सांस्कृतिक कामाच्या खर्चाची तरतूद करणेत येते व तो खर्च नगरपालिकेमार्फत दिला जातो.[५२]

| सन | खर्च |
|---|---|
| १. १९७४-७५ | ७,०००/- |
| २. १९८१-८२ | १०,०००/- |
| ३. १९८२-८३ | ११,३०७.९० |
| ४. १९८३-८४ | - |
| ५. १९८४-८५ | - |
| ६. १९८५-८६ | - |
| ७. १९८६-८७ | २२,०००/ |

| सन | खर्च |
|---|---|
| ८. १९८७-८८ | १०,१००/- |
| ९. १९८८-८९ | - |
| १०. १९८९-९० | १९,५५२/- |
| ११. १९९०-९१ | २६,८६९/- |
| १२. १९९१-९२ | १७,३३६/- |
| १३. १९९२-९३ | २१,२०८/- |

थोडक्यात कराड नगरपालिकेने आपल्या गेल्या १३८ वर्षांच्या कालखंडामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाकडे लक्ष दिलेले दिसते. प्राथमिक शिक्षणाच्या शाळेसाठी स्वतंत्र इमारती बांधल्या. शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले. त्याचबरोबर नगरपालिका मदतीने वेगवेगळया बालवाडया सुरु करुन लहान मुलांना शिक्षणाची आवड निर्माण केली, कराडमधील माध्यमिक शाळेसाठी व महाविद्यालयांना भरघोस आर्थिक मदत केली. कराड नगरपालिकेचे वाचनालय एक कराडमधील सांस्कृतिक केंद्र होऊन गेले आहे. त्या वाचनालयाचा सर्वसामान्य वाचकांना उपयोग होतोच पण त्याचबरोबर एम.फिल., पीएच.डी. करणा-या संशोधक अभ्यासकांनाही होत आहे. नगरपालिकेने सुरु केलेल्या वेगवेगळया व्याख्यानमाला म्हणजे कराडकरांना एक बौध्दिक मेजवानीच होय. अशा रितीने सांस्कृतिक क्षेत्रात कराड नगरपालिकेची कामगिरी गौरवशाली आहे.

## संदर्भ

१. ठाकूर बी.के. - इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन टू द डाऊन ऑफ व रिस्पॉन्सीबल गव्हर्मेंट, पृ. ३३९.

२. छाबरा जी.एस. - ॲडव्हान्सड स्टडी इन द हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ.४०९.

३. पाटील पी. डी. - संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. २४,५२,९२,१३६.

४. ढवळे ना. वा. दैनिक सकाळ लेख, दि. १९-११-१९९२.

५. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख, दि. २२-११-१९९२.

६. पाटील पी. डी., संपादक - कराड न. पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १३५,१३६,१३७,१३८,१३९.

७. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख कात्रण, दि. २२-११-१९९२.

८. - - महाराष्ट्र जि.प. आणि पंचायत समिती ॲक्ट, प्रकाशक डायरेक्टर ऑफ गव्हर्मेंट प्रिंटींग ॲण्ड पब्लीशिंग, महाराष्ट्र स्टेट बॉम्बे, १९८९.

९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

१०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९७२.

११. - - डिस्ट्रीक्ट म्युनिसीपल ॲक्ट, १८८४.

१२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९७४-७५.

१३. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड - लेखा परीक्षण अहवाल.

१४. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख, दि. २८-९-१९९२.

१५. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- प्राथमिक शाळा इमारत माहिती रजिस्टर, मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३, ज.प्रो. बुक १९७०-७१.

१६. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- सांख्यिकी माहिती अहवाल १९५५, १९७७, १९८८, १९९२, १९९३.

१७. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- सांख्यिकी माहिती अहवाल, १९७७, १९९०, १९९३.

१८. पाटील पी. डी., संपादक - कराड न. पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १३६.

१९. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- सांख्यिकी माहिती अहवाल, १९५५, १९७७, १९८८, १९९२, १९९३.

२०. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- सांख्यिकी माहिती अहवाल, १९७७, १९७९, १९८८, १९९०, १९९२, १९९३.

२१. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड- शिक्षक माहिती रजिस्टर.

२२. कराड नगरपालिका शाळा नं.५ शिक्षिकांची मुलाखत.

२३. कराड नगरपालिका रेकॉर्ड -ज. प्रो. बुक १९८६-८७, पृ. ७४.

२४. पाटील पी. डी., संपादक - कराड न. पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १३६.

२५. कराड नगरपालिका रेकॉर्ड -ज. प्रो. बुक ठराव २/१०, १९८३, मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

२६. कराड नगरपालिका रेकॉर्ड -ज.प्रो. बुक ठराव नं.१/१०, १९८५-८६.

२७. कराड नगरपालिका रेकॉर्ड -जमाखर्च अंदाजपत्रक १९८७-८८, १९९२-९३.

२८. कराड नगरपालिका रेकॉर्ड -ज.प्रो. बुक ठराव नं.५/३६, १९८९.

२९. कराड नगरपालिका शाळा नं.९ शिक्षिकांची मुलाखत.

३०. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड - सावित्रीबाई फुले अहवाल, १९९३.

३१. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ ऑफिस, हेड क्लार्क मुलाखत.

३२. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ - प्रौढ साक्षरता प्रसारण अहवाल, १९९३.

३३. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ - शाळा नं. ९ माहिती.

३४. कराड नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड - किर्द खतावणी १९७६ ते १९९३.

३५. पाटील पी. डी. - संपादक कराड न- पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५ ते १९५५ पृ. ४३, ५२, १०३.

३६. कराड नगरपालिका मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

३७. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख, दि. १० ऑक्टोबर, १९९२.

३८. कराड नगरपालिका रेकॉर्ड- ज.प्रो. बुक ठराव नं.५/४१ १९७३.

३९. कित्ता - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

४०. गुरव नंदकुमार - दैनिक प्रितिसंगम, कराड नगर वाचनालय लेख, दि.७.११.१९९९.

४१. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख, दि. १० ऑक्टोबर, १९९२.

४२. गुरव नंदकुमार - दै. प्रितिसंगम लेख, दि. ७-११-१९९९.

४३. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य नगर भवन, मुंबई २३, दि.११.४.१९८८.

४४. कराड नगरपालिका रेकॉर्ड- मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

४५. काड नगरपालिका नगर वाचनालय कराड - शारदीय व्याख्यानमाला कार्यक्रम पत्रिका.

४६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

४७. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - प्रकाशक- भिसे आनंद आबाजी कराड मुद्रणालय, कराड १९८०.

४८. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - प्रकाशक- कराड नगरपालिका, कराड लोकमान्य मुद्रणालय, कराड १९९५-९६.

४९. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - प्रकाशक- पाटील पी.डी. श्री साईनाथ प्रिंटींग प्रेस कराड, १९७५.

५०. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - प्रकाशक- कराड नगरपालिका, कराड लोकमान्य मुद्रणालय कराड - १९९५-९६.

५१. कित्ता - सन १९९५-९६.

५२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७४-७५, १९८१-८२, १९८३-८४ व नगरपालिका जमाखर्च अंदाजपत्रक १९७४-१९९३.